# .. Renuka Ashtakam by Vishnudas in Marathi ..

# ॥ रेणुकाष्टक मराठी श्रीविष्णुदासकृत ॥

## Document Information

Text title : viShNudAsakRita reNukAShTaka marAThI
File name : reNukAaShTakaVishnudasMarathi.itx
Category : aShTaka
Location : doc_devii
Author : Vishnudas
Language : Marathi
Subject : philosophy/hinduism/religion
Transliterated by : Kaushal S. Kaloo kaushalskaloo at gmail.com
Proofread by : Kaushal S. Kaloo kaushalskaloo at gmail.com
Description-comments : http://www.youtube.com/watch?v=j9_GT6tIs3s
Latest update : June 22, 2013
Send corrections to : Sanskrit@cheerful.com
Site access : http://sanskritdocuments.org

This text is prepared by volunteers and is to be used for personal study and research. The file is not to be copied or reposted for promotion of any website or individuals or for commercial purpose without permission.

Please help to maintain respect for volunteer spirit.

August 2, 2016

*sanskritdocuments.org*

# ॥ रेणुकाष्टक मराठी श्रीविष्णुदासकृत ॥

श्रीगणेशाय नमः ।

लक्ष-कोटि-चण्डकीर्ण-सुप्रचंड विलपती ।
अंब  चंद्रवदनबिंब दीप्तीमाजि लोपती ।
सिंह-शिखर-अचलवासि मूळपीठ नायिका ।
धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥ १॥

आकर्ण अरुणवर्ण नेत्र श्रवणीं दिव्य कुंडले ।
डोलताति पुष्पहार भार फार दाटले ।
अष्टदंडि बाजुबंदि कंकणादि मुद्रिका ।
धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥ २॥

इंद्रनीळ-पद्मराग-पाचहीर वेगळा ।
पायघोळ-बोरमाळ-चंद्रहार वेगळा ।
पैंजणादि भूषणेच लोपल्याति पादुका ।
धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥ ३॥

इंद्र-चंद्र-विष्णु-ब्रह्म-नारदादि वंदिती ।
आदि-अन्त ठावहीन आदिशक्ति भगवती ।
प्रचंड चंडमुंड खंडविखंडकारि अंबिका ।
धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥ ४॥

पर्वताग्रवासि पक्षि अंब ! अंब ! बोलती ।
विशाल शालवृक्ष रानीं भवानि ध्यानि डोलती ।
अवतार कृत्यासार जड-मुडादि तारका ।
धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥ ५॥

अनंत ब्रह्मांड पोटि पूर्वमुखां बैसली ।
अनंतगुण अनंतशक्ति विश्वजननि भासली ।
सव्यभागि दत्त-अत्रि वामभागि कालिका ।
धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥ ६॥

पवित्र मातृक्षेत्र धन्य वास पुण्य आश्रमीं ।
अंबदर्शनास भक्त अभक्त येति आश्रमीं ।
म्हणूनि विष्णुदास निजलाभ पावला फुका ॥

धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष रेणुका ॥ ७॥

॥ श्रीरेणुकार्पणमस्तु ॥

http://www.youtube.com/watch?v=j9_GT6tIs3s

Encoded and proofread by Kaushal S. Kaloo kaushalskaloo at gmail.com

.. Renuka Ashtakam by Vishnudas in Marathi ..
was typeset on August 2, 2016

Please send corrections to *sanskrit@cheerful.com*